# मेट्रो-३ प्रकल्पग्रस्तांचे राहत्या ठिकाणीच पुनर्वसन

## अश्विनी भिडे : गिरगावकरांच्या सहमतीनंतरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ हा मेट्रो-३ भुयारी मार्ग दक्षिण मुंबईतील गिरगाव आणि काळबादेवी या मोक्याच्या ठिकाणांवरुन जात असून, या प्रकल्पामुळे गिरगावसह काळबादेवीमधील अनेक इमारती आणि चाळी बाधित होत आहेत. परिणामी, गिरगावकरांचा मेट्रो-३ला विरोध असून, प्रकल्प उभा राहिला तरी राहत्या जागेवरच पुनर्वसन झाले पाहिजे, अशी भूमिका येथील रहिवासी, सामाजिक संस्था आणि राजकीय पक्षांनी घेतली आहे. या भूमिकेवर काळबादेवी आणि गिरगाव भागातील रहिवाशांच्या पुनर्वसनासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने कमीत कमी इमारती बाधित व्हाव्यात शिवाय ते राहत असलेल्या ठिकाणीच त्यांना घरे मिळावीत यासाठी नियोजन केले आहे, अशी माहिती कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी दिली.



### मेट्रो ३ : ३३.५ किलोमीटर लांबीचा मार्ग

- कुलाबा-वांद्रे-सीप्झ हा ३३.५ किलोमीटर लांबीचा मार्ग २६ भुयारी आणि एका जमिनीवरील स्थानकाद्वारे जोडला जाईल.
- मेट्रो-३ चा मार्ग संपूर्णत: भुयारी असून, या मार्गावरील स्थानकांकरिता प्रवेश-निकास आणि इतर सुविधांकरिता जमिनीची गरज आहे.

काळबादेवी-गिरगावचा पुनर्वसनाचा आराखडा शासनाला २७ एप्रिल, २०१६ रोजी सादर करण्यात आला आहे. यापूर्वी घेण्यात आलेल्या जनसुनावणीदरम्यान रहिवाशांनी निदर्शनास आणून दिलेले मुद्दे लक्षात घेत आराखडा बनवण्यात आला आहे. आराखड्यावर नगर रचना विभागाच्या संचालकांनी सकारात्मक अभिप्राय दिले आहेत. प्रत्येक भूखंड स्वतंत्रपणे पुनर्विकसित करण्यातील अडचणी लक्षात घेता या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या सर्व इमारतींचा एक क्लस्टर म्हणून पुनर्विकासासाठी विचार करण्याची विनंती शासनाला आराखड्याद्वारे करण्यात आली आहे. आराखड्याला शासनाची मंजुरी लवकरच मिळणे अपेक्षित आहे. सर्व बाधितांचे ते राहत असलेल्या ठिकाणी पुनर्वसन करण्याचा उद्देश असून, मेट्रो स्थानकांचे बांधकाम सुरु असतानाच बाधितांच्या पुनर्विकासासाठी आम्ही काम करणार आहोत. मेट्रो-३च्या मार्गामधील सर्व इमारतींच्या स्थितीचे सर्वेक्षण कॉर्पोरेशन करत आहे. इमारतींच्या स्थितीचे सर्वेक्षण आणि तलसम सर्वेक्षण सुरक्षेसाठी महत्वाची असून, हे काम करणे कंत्राटदाराला बंधनकारक आहे. प्रत्यक्ष मेट्रो स्थानकांची व बोगद्याची कामे सुरु होण्यास कालावधी असून, हे काम सुरु करण्यापूर्वी शासनाकडून मंजूर झालेला पुनर्विकास आराखडा प्रकल्पग्रस्तांना दाखविण्यात येईल. त्यावरील त्यांच्या सहमतीनंतरच प्रत्यक्ष प्रकल्पाची कामे सुरु करण्यात येतील, असे भिडे यांनी सांगितले. (प्रतिनिधी)